# 'हिंदू महिला सभे'चा नवरात्र महोत्सव

**या गावाहून त्या गावाला**

**विश्वास मेहेंदळे**

पुणे शहर विभागलं गेलं आहे ते वेगवेगळ्या पेठांमध्ये. या पेठांमध्ये अनेकदा उठून दिसते ती सदाशिव पेठ. किंबहुना आजही पुणं ओळखलं जातं ते याच सदाशिव पेठेमुळं. कारण ही पेठ खूपच वैशिष्ट्यपूर्ण आणि इतर पेठांपेक्षा वेगळी आहे. इतर पेठांमध्ये सर्वसाधारणपणे मिश्र स्वरूपाची वस्ती आहे. पण नारायण, शनिवार, कसबा आणि खास करून सदाशिव पेठेत ब्राह्मण समाजाची वस्ती जास्त आहे. या पेठेत वासुदेव बळवंत फडके या क्रांतिकारकानं सुरू केलेली 'पेरुगेट भावे स्कूल' ही शाळा आहे. 'ज्ञान प्रबोधिनी' ही आप्पा पेंडसे यांनी सुरू केलेली शाळा आहे. साधारणत: 'ब्राह्मणी' म्हणावं असंच इथलं वातावरण आहे आणि सगळ्यात मुख्य म्हणजे बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, विष्णुशास्त्री चिपळुणकर, 'भाला'कार भोपटकर, 'काळ'कर्ते शिवराम महादेव परांजपे, क्रांतिकारक वासुदेव बळवंत गोगटे अशी एकेक दिग्गज राष्ट्रीय नेते मंडळी, इतकंच काय पण स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर आणि त्यांचा हिंदू महासभा हा पक्षही या भागात वावरलेला आहे.

याच भागात 'शिवाजी मंदिर' या नावाची संस्था आज अनेक वर्षे काम करते आहे. याच शिवाजी मंदिरातच 'हिंदू महिला सभा' या संस्थेच्या वतीने दरवर्षी 'नवरात्र महोत्सव' साजरा केला जातो. या महोत्सवाचं यंदाचं ६६ वं वर्ष. या संस्थेच्या अध्यक्षा म्हणून सध्या सुप्रिया दामले या कार्यरत आहेत. त्या डी. जी. कॉपियर्सच्या किंवा खरं तर 'आम्ही चक्क कॉपी करतो' अशी जाहिरात करणाऱ्या एका मान्यवर झेरॉक्स कंपनीच्या मालकीणबाई आहेत. हा महोत्सव दहा दिवस चालतो. हिमानीताई सावरकर या वीर सावरकरांच्या [illegible] या संस्थेच्या आधी अध्यक्षा होत्या; पण त्यांचं नुकतंच निधन झालं आणि सुप्रियाताईंच्या अंगावर अध्यक्षपदाची धुरा येऊन पडली. या मंडळातल्या साऱ्या महिला बऱ्यापैकी, किंबहुना सुस्थितीतील महिला आहेत. चांगल्या शिकल्यासवरलेल्याही आहेत. त्यांच्या कार्यकारिणीत सुप्रिया दामले या तर अध्यक्षा आहेतच; पण त्यांच्याशिवाय



मेघना गानू, श्रद्धा कर्वे, मधुरा जोगळेकर, सुनीता अभ्यंकर, स्मिता गानू, वंदना जोगळेकर, मेघा फडके आणि तृप्ती कैसरी अशा इतर महिला आहेत. सगळ्या कार्यकारिणी सदस्या दररोज नित्यनियमानं कार्यक्रमांना हजर तर असतातच; पण त्याचबरोबर पदर बांधून काम करतानाही दिसतात- हसतमुखानं! ज्या 'शिवाजी मंदिर' या सभागृहात हा समारंभ होतो ते 'शिवाजी मंदिर' एकेकाळी व्याख्यानं-प्रवचनं-कीर्तनं इत्यादी कार्यक्रमांसाठी खूपच लोकप्रिय होतं. याच शिवाजी मंदिरात खुद्द स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भाषणं, कीर्तनकार गोविंदस्वामी आफळे यांच्यासारख्या कीर्तनकारांची कीर्तनं किंवा बाळशास्त्री हरदास यांच्या सारख्यांची १५-१५ दिवस या भागातल्या मंडळींनी प्रवचनं ऐकलेली आहेत. खरोखरीच मराठी संस्कृती जोपासणारा आणि ती वृद्धिंगत करणारा असा हा परिसर आहे.

या ठिकाणी 'हिंदु महिला सभे'च्या वतीनं नवरात्रीत नऊ दिवस सांस्कृतिक-सामाजिक कार्यक्रमांची नुसती रेलचेल असते. अष्टमीला मुखवट्याची देवी आणि प्रसादाचं भोजन असाही कार्यक्रम असतो. मला असं वाटतं की, पुरुषांपेक्षा महिला या व्यवस्थापनात अधिक उजव्या ठरत असतात. त्यामुळं खूप आधीपासून कार्यक्रमांची आखणी करणं, त्याचं नियोजन करणं आणि ठरवलेले कार्यक्रम ठरल्याप्रमाणं होतील, याची खात्री देणं महिला मंडळ करतात. 'हिंदू महिला सभे'च्या विद्यमान अध्यक्षा सुप्रिया दामले आणि त्यांच्या कार्यकारिणी सदस्या त्यांना या संदर्भात खूप सहाय्य आणि सहकार्य करताना दिसतात. या साऱ्या महिला उच्च-मध्यम वर्गातल्या जरूर आहेत. 'पण एकदा त्यांच्यावर एकेका कामाची जबाबदारी सोपवली की, अध्यक्षा म्हणून मी निर्धास्त असते,' अशी कबुली सुप्रिया दामले देताना दिसतात. सहासष्ट वर्षे, मंडळ तेही महिलांचं चालवणं हे तसं अवघड काम आहे.अनेकदा रुसवे-फुगवे होतातही; पण पुढच्याच क्षणी महिला कामास लागतात. कार्यक्रम ठरवण्यात, तर त्यांच्या पुढाकार असतोच पण त्याच बरोबर सारी व्यवस्था बघणं, पाहुणे ठरवणं, इतकंच काय पण प्रायोजक सुद्धा या महिलांच्या प्रयत्नांतूनच मिळतात आणि तेही या मंडळाचं वैशिष्ट्यं मानायला हवं.

या वर्षीच्या कार्यक्रमात घटनस्थापनेच्या पहिल्या दिवशी अनुजा वहीकर यांचं 'नवदुर्गा' हे भरतनाट्यम् होतं आणि वसुधा मेहेंदळे यांचं कथाकथन होतं. दुसऱ्या दिवशी पु. ल. देशपांडे यांच्या 'रविवारच्या कहाणी'चा प्रयोग होता. मला प्रमुख पाहुणा म्हणून आमंत्रित करण्यात आलं होतं. महेश पाटणकर या चार्टर्ड अकौंटंट्सची फर्म चालवणाऱ्या सी.ए.नं. त्यांच्या इतर सहकारी सी.ए.ना बरोबर घेऊन 'सी.ए. आर्टस ॲन्ड स्पोर्टस सर्कल' यांच्यातर्फे हा एक चांगला कार्यक्रम सादर केला. त्यानंतर अवधूत गांधी यांचा 'संतवाणी' हा कार्यक्रम तीन तारखेला संध्याकाळी झाला. त्यानंतर चार तारखेला म्हणजे चौथ्या माळेच्या दिवशी मंगलाताई चितळे, शशांक दिवेकर आणि जयश्री कुबेर यांनी 'ज्योतीने तेजाची आरती' हा सुधीर फडके आणि माणिक वर्मा यांनी गायिलेल्या गीतांवर आधारित कार्यक्रम सादर केला. पाचव्या माळेला शुभांगी दामले आणि मंडळींनी कथा अभिवाचनाचा एक आगळावेगळा कार्यक्रम सादर केला. सहाव्या दिवशी अनुराधा देशपांडे यांचं सुश्राव्य कीर्तन झालं. सातव्या माळेला 'नकटीच्या लग्नाला' हा अनिल स्वकुळ यांचा एकपात्री कार्यक्रम सादर झाला. आठव्या दिवशी म्हणजे अष्टमीच्या दिवशी 'महालक्ष्मी पूजन आणि महालक्ष्मी दर्शन' असा कार्यक्रम पार पडला. रविवारी ९ तारखेला 'तेजस्विनी भक्तीगीत मंडळानं' भजनाचा कार्यक्रम सादर केला. दहा तारखेला डॉ. रवींद्र आणि स्मिता कोल्हे यांचा अनुभव कथनाचा कार्यक्रम होता. दहाव्या दिवसानंतर येणाऱ्या अकराव्या दिवशी दसऱ्याचा कार्यक्रम मोठ्या दिमाखात साजरा होऊन हा महोत्सव संपला.

हिंदू महिला सभेचा हा कार्यक्रम प्रातिनिधिक स्वरूपाचाच मानायला हवा. स्त्रीमुक्ती, स्त्री-पुरुष समानता, महिलांना मंदिर- मशीद प्रवेश या दृष्टीनं साऱ्या राज्यात सध्या महिला जागृतीचे विविध कार्यक्रम राबवले जात आहेत. शनि-शिंगणापूर काय की मुंबईमधलं हाजी अली हे देवस्थान काय, महिलांनी प्रवेशासाठी आंदोलनं केल्यामुळं सध्या प्रसारमाध्यमांमध्ये चर्चेत आहेत. अशा साऱ्या पार्श्वभूमीवर शिवाजी मंदिर या ठिकाणी गेली सहासष्ट वर्षे चाललेली 'हिंदू महिला मंडळा'चा हा नवरात्र-महोत्सव खूपच महत्त्वाचा वाटतो. अष्टमीला मुखवट्याची देवी करून तिची मोठ्या प्रमाणात सजावट केली जाते. नित्यनियमानं आरती-प्रसाद तर होतोच पण त्याच बरोबर 'सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽऽस्तुते' अशी या देवीची प्रार्थनाही केली जाते. पुण्यात तांबडी जोगेश्वरी, पिवळी जोगेश्वरी, काळी जोगेश्वरी अशी अनेकविध मंदिरे आहेत. तिथं भक्तांच्या दर्शनासाठी मोठमोठ्या रांगासुद्धा लागतात; पण सांस्कृतिक कार्यक्रमांचा जागर करून देवींच्या भक्तांना वाटते जागृती यावी यासाठी 'हिंदू महिला मंडळा'चा उपक्रम स्तुत्यच!